# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्यात सर्व स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी एकत्रितरित्या सोपविण्याच्या दृष्टीने १९४८ साली तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर अल्पावधीतच महाराष्ट्र राज्याने औद्योगिक क्षेत्रात मोठी झेप घेतली. औद्योगिक उत्पादनाच्या घटक रचनेत लक्षणीय बदल झाल्यामुळे या औद्योगिक घटकांना निरनिराळया स्तरावर लागणारे तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळ व त्यांच्याकरिता पुनर्प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने राज्यात प्रशिक्षणाच्या सोईमध्ये प्रचंड वेगाने वाढ झाली. या विविध कार्यक्रमांचे संचालन व प्रशासन यांची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टीने तंत्र शिक्षण संचालनालयाचे १९८४ साली विभाजन करुन तंत्रशिक्षण संचालनालय व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अशी दोन संचालनालये निर्माण करण्यात आली. यापैकी व्यवसाय शिक्षणांतर्गत माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविले जातात व व्यवसाय प्रशिक्षणांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना व शिकाऊ उमेदवारी योजना या प्रमुख योजना राबविण्यात येतात.

**संचालनालयाचे ध्येय:**

- औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळाचा सातत्याने पुरवठा करणे.
- तंत्रज्ञानात कालानुरूप होणारे बदल विचारात घेऊन त्यानुसार प्रशिक्षणात सुधारणा करुन प्रशिक्षणाचा दर्जा अद्ययावत ठेवणे.
- व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण समाजातील सर्व स्तरातील घटकांना उपलब्ध करुन देऊन उमेदवाराला रोजगार व स्वयंरोजगारासाठी सिध्द करणे.

## व्यवसाय प्रशिक्षणाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना

**१. शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेची ठळक वैशिष्ट्ये:**

१.१ राज्यातील एकूण ४१७ शासकीय व ५३८ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन एकूण ७९ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे एकूण २३ व्यवसाय अभ्यासक्रम, दोन वर्ष कालावधीचे एकूण ३२ व्यवसाय अभ्यासक्रम, तसेच बिगर अभियांत्रिकी गटात एक वर्ष कालावधीचे २४ व्यवसाय अभ्यासक्रमांचा अंतर्भाव आहे. औ.प्र.संस्थेतील ११ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण व ६८ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आली आहे. प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम यशस्वारीत्या पूर्ण करुन परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेवारास प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या कडून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे (NCVT) राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (National Trade Certificate-NTC) दिले जाते.

१.२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक (Practical) भाग ७० टक्के व सैध्दांतिक (Theory) भाग ३० टक्के आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर रोजगार व स्वयंरोजगाराबरोबरच उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो.

१.३ राज्यातील सर्व समाजघटकांना व्यवसाय शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या शासकीय औ.प्र.संस्थांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औ.प्र.संस्थांचे प्रकार | शासकीय औ.प्र.संस्था |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण औ.प्र.संस्था | ३०७ |
| २ | आदिवासी उमेदवारांसाठी | ६१ |
| ३ | फक्त महिलांसाठी | १५ |
| ४ | आदिवासी आश्रमशाळामध्ये औ.प्र.संस्था | २८ |
| ५ | अनु.जाती व नवबौध्द उमेदवारांसाठी | ४ |
| ६ | अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी | २ |
| ७ | Total | ४१७ |

१.४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध व्यवसाय अभ्याक्रमात प्रशिक्षण देताना सदर प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभूत सुविधांचा महत्तम विनियोग व्हावा व कुशल मनुष्यबळाचे प्रमाण वाढावे म्हणून राज्यात महापालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या ४१ शासकीय औ.प्र. संस्थेत तीन पाळीत, २३४ शासकीय औ.प्र. संस्थेत दोन पाळीत व १४२ शासकीय औ.प्र. संस्थेत एका पाळीत प्रशिक्षण दिले जाते.

१.५ प्रवेश प्रक्रीयेत पारदर्शकता व प्रवेशोच्छुक उमेदवारांच्या सोईसाठी राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१३ सत्राची तथा शासकीय बरोबरच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१५ पासूनची प्रवेशप्रक्रीया ही केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीने राबविण्यात येत असून याप्रकारे ऑनलाईन स्वरुपात प्रवेश प्रक्रीया राबविणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम राज्य ठरले आहे.

१.६ औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी सर्वसाधारण दिनांक ०१ जून पासून प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रवेशाची सर्व कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण होऊन दिनांक ०१ सप्टेंबर पासून नियमित प्रशिक्षणास सुरुवात होते. प्रवेशाबाबत तपशिलवार माहिती प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे उपलब्ध असते. प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

१.७ औ.प्र.संस्थेतील सुविधा प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांसह सुसज्ज कार्यशाळा, प्रात्यक्षिकासाठी हत्यार संच, कच्चामाल, ॲपरन आणि स्टेशनरी, अभ्यासाकरिता ग्रंथालय/पुस्तक पेढी, दररोज ये-जा करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी रेल्वे व बस मासिक पासकरिता शिफारसपत्र, गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश, आदिवासी मुला-मुलींकरिता स्वतंत्र वसतिगृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी नियमाप्रमाणे सुविधा, रोजगार व स्वयंरोजगारासाठी नाव नोंदणी या बाबी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

१.८ प्रशिक्षण शुल्क: शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांसाठी अत्यंत माफक प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना (EBC) प्रशिक्षण शुल्कातुन सूट मिळते तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना (उन्नत गटातील प्रशिक्षणार्थी वगळून) प्रशिक्षण शुल्क माफी देण्यात येते.

१.९ निर्वाहभत्ता: वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह अनुक्रमे रु. ६००/- व रु. ५००/- या प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येतो.

१.१० विद्यावेतन: आर्थिकदृष्टया मागास असलेल्या (EBC) प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांच्या ५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमाह रु. ४०/- विद्यावेतन मंजूर करण्यात येते. उच्च उत्पन्न गटातील मागासवर्गीय प्रशिक्षणार्थी वगळून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदरचे विद्यावेतन रु. ६०/- प्रतिमाह या प्रमाणे मंजूर करण्यात येते.

१.११ शिष्यवृत्ती: अनुसूचित जातीच्या (SC) प्रशिक्षणार्थ्यांना तसेच अल्पसंख्यांक समाजातील प्रशिक्षणार्थ्यांना (Minority) मॅट्रिकोत्त्तर शिष्यवृत्ती नियमाप्रमाणे अनुज्ञेय आहे.

## २. शिकाऊ उमेदवारी योजना (शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१):

२.१ योजनेची उद्दिष्ट्ये : युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर उद्योगात असणाऱ्या प्रक्रीयांमध्ये लागणारी यंत्रसामुग्री तसेच नवीन व आधुनिक तंत्रज्ञानानुसार औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली.

२.२ योजनेचे स्वरुप : देशातील खाजगी, निमशासकीय व शासकीय उद्योगधंद्याच्या गरजांप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी केंद्रशासनाने उद्योगधंद्यामध्ये इंजिनिअरींग , केमिकल, प्रिंटिंग, कॅटरींग इत्यादी ३९ गटात वर्गीकरण केले असून २५९ व्यवसाय निर्देशित केले आहेत. महाराष्ट्र राज्यात त्यातील एकूण १८१ व्यवसायात प्रशिक्षण देण्यात येते. कालमानाप्रमाणे आवश्यकतेनुसार नवीन व्यवसाय निर्देशित करण्यात येतात व कालबाहय व्यवसाय वगळण्यात येतात. विविध व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेतलेल्या उमेवारांबरोबरच अप्रशिक्षित (Freshers) उमेदवारांची शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत निवड करण्यात येते.

२.३ महाराष्ट्र राज्यातील आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेणे: महाराष्ट्र राज्यात विविध विभागांकडून त्यांच्याकडे नोंदी असलेल्या आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेऊन ती संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या प्रादेशिक कार्यालय व संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांचेकडे सर्वेक्षण/पुनर्सर्वेक्षण करण्याकरिता पाठविली

जाते. संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार त्या आस्थापनेत जाऊन शिकाऊ उमेदवारी योजना १९६१ प्रमाणे प्रशिक्षण सुविधा व एकूण कामगारांच्या २.५ ते १० टक्के या प्रमाणात शिकाऊ उमेदवारांची संख्या निश्चित केली जाते. या निश्चित केलेल्या जागांवर भरती करण्याकरिता कार्यालयीन अधिसूचना निर्गमित केली जाते.

२.४ शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत ४६ शासकीय व १५७ अशासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्याची सोय आहे.

२.५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या योजनेखाली निर्देशित संस्थेतून व्यवसायामध्ये प्रशिक्षण कालावधीमध्ये सूट मिळते. सदर सूट मिळालेल्या उमेदवारांना मूलभूत प्रशिक्षण घ्यावे लागत नाही. त्यांना आस्थापनेत कार्यशाळा प्रशिक्षण सैध्दांतिक विषयाचे प्रशिक्षण द्यावे लागते. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांची परीक्षा केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून दरवर्षी एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात घेण्यात येते व उत्तीर्ण उमेदवारांना सदर परिषदेकडून प्रमाणपत्र देण्यात येते.

२.६ शिकाऊ उमेदवारांची भरती प्रक्रिया: या योजनेखाली विहीत अर्हताधारक शिकाऊ उमेदवार नेमण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित आस्थापनेची आहे. आस्थापनेचे प्रतिनिधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्ष जाऊन मुलाखत/लेखी परिक्षेद्वारे उमेदवारांची निवड करतात. आस्थापना/ सेवायोजन कार्यालय जाहिरात किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी मागवून उमेदवारांची निवड करतात. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या इच्छुक उमेदवारांना शासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रातून मुलाखत पत्र देऊन त्यांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच आस्थापना व शिकाऊ उमेदवार एकाच ठिकाणी येण्याकरिता प्रादेशिक स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये भरती मेळाव्याचे आयोजन केले जाते. सदर भरती मेळाव्यात आस्थापना अधिकारी उमेदवारांची मुलाखत घेऊन त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून नियुक्त करतात. सत्रनिहाय भरती मेळाव्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दिली जाते, तसेच भरती मेळाव्याचे वेळापत्रक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सूचनाफलकावर लावले जाते व सर्व आस्थापनांना कळविले जाते.

२.७ शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवार भरतीचा कालावधी: राज्यामध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती फेब्रुवारी/ऑगस्ट या सत्रात करण्यात येते. फेब्रुवारी सत्रासाठी १६ जानेवारी ते १५ एप्रिल व ऑगस्ट सत्रासाठी १६ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत भरती करण्यात येते.

२.८ वय व शारिरिक पात्रता: वय: १४ वर्षे पूर्ण वजन: २५.४ किलो (कमीत कमी)
उंची: १३७ से.मी (किमान) दृष्टी: चांगली

उमेदवारांना शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे अधिकृत वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. शारिरीकदृष्टया अपंग उमेदवारांचा ठराविक व्यवसायासाठी वैद्यकीय अधिकारी यांचे शिफारशीनुसार विचार करण्यात येतो.

२.९ शिकाऊ उमेदवारांना मिळणारे विद्यावेतन: शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. सद्य:स्थितीत प्रचलित दर खालील प्रमाणे आहेत.
(रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना जी.एस.आर. ६८० (अ), दिनांक २२ सप्टेंबर २०१४)

| वर्ष | संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल मजुरांच्या किमान मजुरीच्या |
|---|---|
| प्रथम वर्ष | ७०% |
| द्वितीय वर्ष | ८०% |
| तृतीय वर्ष | ९०% |
| चतुर्थ वर्ष | ९०% |

२.१० औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत अनुज्ञेय असलेली सूट विचारात घेऊन प्रवेश दिला जातो. त्यांची प्रशिक्षणाची सूट लक्षात घेऊन त्यांना त्या अनुषंगाने विद्यावेतन देय असते.

२.११ शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना: ज्या आस्थापनांचा व्यवहार १०० कोटी पेक्षा कमी आहे अशा एम.एस.एम.ई. आस्थापनांतील शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाच्या ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती केंद्र शासनामार्फत केली जाते. सदर रक्कम उमेदवाराच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाते.

२.१२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत रोजगाराची व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याने शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत प्रशिक्षित व अप्रशिक्षित उमेदवारांसाठी उपलब्ध असणाऱ्या जागा रिक्त राहतात.

## ३. प्रगत व्यवसाय प्रशिक्षण योजना:

प्रगत व्यवसाय प्रशिक्षण योजना ही नाविन्यपूर्ण, बहुकौशल्यावर आधारीत योजना केंद्र व राज्य सरकारांनी सामाईकरित्या संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना व जागतिक बँक यांच्या अर्थसहाय्याने सन १९७७ मध्ये सुरू केली. सदर योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये, औद्योगिक आस्थापनांमध्ये कार्यरत मनुष्यबळास कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

राज्यात अंबरनाथ, नाशिक, औंध-पुणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापुर आणि नांदेड या ८ शासकीय औ.प्र.संस्थांच्या आवारात प्रगत व्यवसाय प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली असून सदर संस्थेत एकूण १४ अल्पमुदतीच्या विविध व्यवसायांमध्ये ८२४० प्रशिक्षण क्षमता उपलब्ध आहे.

## ४. हायटेक प्रशिक्षण योजना:

सदर योजना रोजगार महासंचालनालयामार्फत जागतिक बँक प्रकल्पांतर्गत १९९९ साली उच्च तंत्रज्ञान व बहुकौशल्यावर आधारीत प्रशिक्षणासाठी सुरू करण्यात आली. सदर योजनेंतर्गत शासकीय औ.प्र.संस्था, औंध-पुणे येथे इलेक्ट्रॉनिक्स व संगणकक्षेत्रात अल्पमुदतीच्या प्रशिक्षणासाठी हायटेक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली.

## ५. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना:

ज्या संस्थांचा जागतिक बँक प्रकल्पांतर्गत समावेश झालेला नाही, अशा देशातील एकूण १३९६ शासकीय औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ या योजनेंतर्गत करण्यात आला आहे. यात राज्यातील एकूण २५० संस्थांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या योजनेत सहभागी संस्थांना प्रत्येकी रु. २.५० कोटी रक्कम व्याजमुक्त कर्ज रुपाने केंद्रशासनाकडून देण्यात आलेली आहे. सदरहू कर्जाची परतफेड ११ व्या वर्षापासून ३० व्या वर्षापर्यंत समान २० हप्त्यात करावयाची आहे.

## ६. औद्योगिक मूल्य वर्धित कौशल्य वाढ (STRIVE)

संस्थात्मक प्रशिक्षण प्रणालीमध्ये आवश्यक असलेल्या संस्थात्मक सुधारणांना प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकारने प्रकल्प विकसित केला आहे. औ.प्र. संस्था आणि शिकाऊ उमेदवारी योजना चार क्षेत्रावर केंद्रित आहे.

६.१ **क्षेत्र १:** प्रशिक्षण सुविधा, यंत्र सामग्री शाधन सामग्रीचा दर्जा वाढ करून आणि नवीन व्यवसाय अभ्यासक्रम वाढवून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची कामगिरी सुधारणे. महाराष्ट्र राज्याने ७३ ते ८१ शासकीय आयटीआयचे उद्दिष्ट निश्चित केले असून केली असून आतापर्यंत ३८ शासकीय आयटीआय आणि ४ खासगी आयटीआय निवडल्या गेल्या आहेत. प्रशिक्षण सुविधांच्या उन्नतीकरिता संस्थेतील प्रवेशाच्या आधारावर प्रत्येक आयटीआयला रु. १.५० कोटी ते २.५०० कोटी एवढा निधी प्राप्त होणार आहे.

६.२ **क्षेत्र २:** औ.प्र. संस्था आणि शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस सहाय्य करण्यासाठी राज्य सरकारची वाढीव क्षमता आणि औ.प्र. संस्थाच्या एकंदर नियामक व परिचालन वातावरणात सुधारणा करण्याकरिता आणि राज्य स्तरावर औद्योगिक समूह (Industry Clusters) स्थापन करण्यासाठी राज्य सरकारांना पाठबळ प्रदान करणे

६.३ **क्षेत्र ३:** शैक्षणिक साहित्याचे आधुनिकीकरण करून तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शिकविण्याच्या व शिकण्याच्या दर्जा उंचावणे.

६.४ **क्षेत्र ४:** क्लस्टर अप्रोचच्या माध्यमातून औपचारिक सुधारित व विस्तृत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाद्वारे एमएसएमईंना शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम बनविणे

**७. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (NAPS)**

**उद्दिष्ट:** शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस चालना देणे तसेच सन २०२० पर्यंत भारती झालेल्या शिकाऊ उमेदवारांची संख्या २.३ लाखावरून ५० लाख करणे

**सहभाग:** विहित विद्यावेतनाच्या २५% वा जास्तीत जास्त रू. १५०० /- प्रती माह प्रती शिकाऊ उमेदवार याप्रमाणे रोजगार दात्यास अदा करणे आणि कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेता थेट शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या मूलभूत प्रशिक्षण खर्चाची वाटणी करणे. ५०० तास ते ३ महिने कालावधीच्या मुलभूत प्रशिक्षणाचे शुल्क अधिकतम रु. ७५०० राहील.

**८. राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना :**

८.१ आर्टिझन टु टेक्नोक्रॅट प्रशिक्षण योजना
८.२ लोकसेवा केंद्र
८.३ उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना
८.४ मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण योजना
८.५ अल्पसंख्यांकासाठी प्रशिक्षण योजना

**९. सामंजस्य करार (MoU):**

केंद्र शासनाच्या दिनांक २७.०२.२०१४ रोजीच्या अधिसुचनेनुसार कंपनी कायदयाखाली नोंदणीकृत असलेल्या सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या वार्षिक उत्पन्नापैकी काही निधी हा Corporate Social Responsibility Policy या अंतर्गत विविध समाजोपयोगी कामांसाठी खर्च करावयाचा असतो त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन निर्णय क्र. पीपीपी २०१३/प्र.क्र.१०३/१३/व्यशि-५, दिनांक २९ मे, २०१५ अन्वये Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत विविध औद्योगिक आस्थापनांबरोबर करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने आजपर्यंत राज्यातील विविध नामांकीत औद्योगिक आस्थापना जसे Tata Motors, Tata Power, Mahindra & Mahindra, Samsung, Maruti Suzuki, Siemens, Tata Trust, Bosch, Volkswagen, Bharat Forge, Sandvik, Hindustan Aeronautics, Bharat Electronics Ltd., Mazgaon Dock, Loreal, Konkan Railway, Schindler इत्यादीं समवेत सामंजस्य करार केलेले आहेत. सद्य:स्थितीत २७ नामांकीत औद्योगिक आस्थापनांशी सामंजस्य करार करण्यात आलेले असून त्यांच्याव्दारे एकूण रु. ६३.९२ कोटी निधीचा विनियोग करुन राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांतील प्रशिक्षण सुविधांचा दर्जावाढ करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याअंतर्गत राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणे, On the Job Training, रोजगाराच्या संधी, निदेशाक प्रशिक्षण कार्यक्रम, अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणे उपलब्ध करुन देणे, इतर आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणे यासारख्या बाबी प्रथम प्राधान्याने राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक आस्थापनेतील तज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त होण्यासाठी संचालनालय, L&T Ltd व Confederation of Indian Industry यांच्या मार्फत प्रत्येक शनिवारी Video Conferencing च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो.

**१०. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद**

(Maharashtra State Council of Vocational Training -MSCVT)

प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांच्या निदेशानुसार राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या धर्तीवर संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत दि.२९ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली.
महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची कार्ये

१०.१ **अभ्यासक्रमांना मान्यता:** परिषदेमार्फत विविध अभ्यासक्रम तयार करणे आणि मागणीनुरुप व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देणे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत ३२ व्यवसाय अभ्यासक्रमांना परिषदेने अद्यापर्यंत मान्यता दिलेली आहे.

१०.२ **निरीक्षण संस्थांची सुचिबद्धता:** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तांत्रिक विद्यालये, तंत्रनिकेतने आणि अभियांत्रिकी महाविद्यालये यांना थेट निरीक्षण संस्था म्हणून मान्यता प्रशिक्षण संस्थांना संलग्नता प्राप्त करुन देण्यासाठी त्यांचे निरीक्षण व प्रशिक्षणाचे सहनियंत्रण इत्यादी बाबी निरीक्षण संस्थांमार्फत करण्यात येतात.

१०.३ **व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) यांना संलग्नता देणे:** राज्यात मोठया प्रमाणात मान्यता प्रापत नसलेल्या संस्थामार्फत कौशल्याधारीत प्रशिक्षण देण्यात येते. तथापि, असे अभ्यासक्रम मान्यता प्राप्त नसतात आणि त्यांना उद्योगांकडून देखील मान्तया मिळत नाही. तसेच कौशल्य क्षेत्रामध्ये विविध शासकीय आस्थापना काम करत असून त्यांचे उपक्रम एकल स्वरुपात आणि बऱ्याच अंशी त्यामध्ये व्दीरुक्ती निर्दशनास येते व त्यात समन्वयाचा अभाव आढळतो. या सर्व बाबींचा विचार करुन दि.२६.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) ही संकल्पना अंमलात आणली.

१०.४ **कौशल्य चाचणी संस्थांनी संलग्नता देणे**- व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संस्थांमार्फत यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची कौशल्य चाचणी कौशल्य चाचणी संस्थांमार्फत घेण्यात येते.

Agriculture Skill Council of India, Sector Skill Council for Mining व Electronics Sector Skill Council यांनी परिषदेस कौशल्य चाचणी संस्था म्हणुन मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यी कौशल्य चाचणी संस्था म्हणुन परिषदेमार्फत पूर्व व्यावसायिक विषयांच्या (V१, V२, V३ व V४) प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतात.

"गट शेती प्रवर्तक" या व्यवसाय अभ्यासक्रमाची दि. १५ जुलै, २०१९ रोजी एकाच दिवशी ३००० शेतकऱ्यांची कौशल्य चाचणी यशस्वीपणे घेवुन India Book of World Records व Asia Books of World Record मध्से नाव नोंदवीले आहे.

## व्यवसाय शिक्षण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना

१. **माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम:**

१.१ सन १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर कार्यानुभव आधारीत विषय घेण्यावर भर देण्यात आला होता, जेणेकरुन भावी आयुष्यात विद्यार्थी वर्ल्ड ऑफ वर्कसाठी तयार होऊ शकतील. सदर अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विषयातील मुलभूत कौशल्ये आत्मसात करता येतात. त्या कौशल्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो. आवश्यकतेनुसार सदर कौशल्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी विद्यार्थी अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकडे वळू शकतो अथवा आपल्या आवडीप्रमाणे रोजगार/स्वयंरोजगार निवडू शकतो. माध्यमिक स्तरावर कार्यानुभव विषयाऐवजी "तांत्रिक" विषयात उपलब्ध तीन विषयांपैकी एक ऐच्छिक विषय म्हणून निवडता येतो.

१.२ इ. ९ वी व १० वी मध्ये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो. शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्रांच्या १० कि.मी. परिसरातील सहयोगी शाळांमधील इ. ९वी व १०वी स्तरावरील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवडयात १ दिवस पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो.

१.३ सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत खालील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| V१ : Multi Skill Foundation Course | V२: Mechanical Technology |
| V३: Electrical Technology | V४: Electronics Technology |
| V५: Automobile Service Technician | V६: General Duty Assistant |
| V७: Private Security | V८: Retail Business |

१.४ अभियांत्रिकी चित्रकलेची मुलतत्वे, विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स विषयातील सर्कीट डायग्राम तसेच संगणकाची मुलभूत तत्वे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात.

१.५ इ. १०वी उत्तीर्ण उमेदवारांना तंत्र निकेतन प्रवेशासाठी १५% जागा राखीव आहेत. इ. ११ वी व्यावसायिक प्रवेशासाठी ४०% जागा राखीव आहेत. तसेच, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी २५% जागा राखीव आहेत.

## २. + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम:

२.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार +२ स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे व रोजगार/स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे, जेणेकरुन महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या उद्देशाने राज्यात शैक्षणिक वर्ष १९७८-७९ पासून शासन निर्णय क्रमांक Education & Youth Service Department Resolution No.VOC/XXXVIII, Dt. ९th August, १९७८ अन्वये "द्विलक्षी अभ्यासक्रम" सुरु करण्यात आले आहेत. इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार करावा व ते शक्य नसल्यास पुढील शिक्षण सुरु ठेवावे असा दुहेरी हेतू या योजनेमध्ये आहे म्हणून या योजनेस द्विलक्षी अभ्यासक्रम असे संबोधण्यात येते.

२.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी व मत्स्य अशा चार गटांमधून १३ द्विलक्षी अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून कार्यरत करण्यात आलेले आहेत.

२.३ इ. ११ वी व १२ वी मध्ये आवश्यक ६ विषयांपैकी एक भाषा व विज्ञान शाखेतील एका विषयात सूट देऊन त्या ऐवजी ३३% व्याप्ती असलेला २०० गुणांचा एक व्यवसाय अभ्यासक्रम शिकविण्यात येतो.

२.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित अभ्यासक्रमात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात प्रति माह विहीत दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे.

२.५ इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या ठराविक प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना थेट प्रविष्ठ होण्याची मुभा आहे.

## ३. +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम:

३.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने इ.११ वी व इ. १२ वी च्या स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड द्यावी व जास्त विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे व महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या हेतूने ७०% व्याप्ती असेलेले व्यवसाय अभ्यासक्रम राज्यात सन १९८८-८९ पासून शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-१०८८/५१५१८/(७०३)/तांशि-२ ड, दिनांक २८.१०.१९८८ अन्वये सुरु करण्यात आलेले आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये ७०% प्रात्यक्षिकांचा व उर्वरित ३०% अभ्यासक्रमात दोन भाषा विषय व एक पायाभूत अभ्यासक्रम (जनरल फाऊंडेशन कोर्स) यांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून हे व्यवसाय अभ्यासक्रम सुधारीत करण्यात आलेले आहेत.

३.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य, अर्धवैद्यकीय व गृहशास्त्र अशा ६ गटांमधून सुधारीत २० व्यवसाय अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून सुरु करण्यात आलेले आहेत.

३.३ इ.१२ वी ची अंतिम परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येते. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात/उद्योगात प्रत्यक्ष कामाच्या जागी ऑन द जॉब ट्रेनिंगची सोय असते.

३.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसायात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून बोट (BOAT) मार्फत १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात प्रतिमहा विहीत दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे .पदविकेच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेशासाठी २% जागा आरक्षित आहे.

३.५ काही अभ्यासक्रमांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांशी समकक्षता देण्यात आलेली आहे तसेच D.Ed. प्रवेशास पात्र आहे.

## ४. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ (MSBVE)

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची स्थापना १९८६ मध्ये झाली. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सहसंचालक दर्जाचे अधिकारी यांना मंडळाचे अध्यक्ष म्हणुन नेमण्यात येते.

राज्यात मध्यम व मोठया औद्योगिक आस्थापनांची तसेच लघुउद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झालेली आहे, त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुध्दा उपलब्ध झालेल्या आहेत. त्या करिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, हा महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ययुक्त करुन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यांत येतात. उपरोक्त अभ्यासक्रमांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार बदल होत आहेत. तसेच औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये असलेली तांत्रिक मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी

सदर योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढत आहे. मंडळाच्या बऱ्याच अभ्यासक्रमांना शिकाऊ उमेदवारी योजना लागू असल्याने उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना त्याचा लाभ घेता येतो.
औद्योगिक आस्थापनांच्या गरजेप्रमाणे तसेच नविन तंत्रज्ञानावर आधारीत नव नविन अभ्यासक्रम मंडळामार्फत तयार करण्यात येत असतात. मंडळाला असणाऱ्या स्वायत्तेमुळे त्यांचे सर्व अभ्यासक्रम तात्काळ अद्यावत करण्यात येतात. सद्य:स्थितीत राज्यातील २५ शासकीय तंत्र माध्यमिक शाळा / केंद्रांमधून व १२३८ खाजगी विनाअनुदानित संस्थामधुन ६ महिने ते २ वर्षे कालावधीचे ३१५ विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत. सद्य:स्थितीत मंडळाच्या अभ्यासक्रमांची प्रशिक्षण क्षमता ६६,३८५ असुन प्रवेश सत्र २०१९ मध्ये ३६,००७ उमेदवारांनी प्रवेश घेतले आहेत.